सामान्य प्रशासन विभाग ,जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
ई मेल - dyceozpsindhu@gmail.com दुरध्वनी क्रमांक - ०२३६२ - २२८८१७
दालन क्र १२९ ,आस्थापना शाखा ,जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत ,पहिला मजला
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग सिंधुदुर्गनगरी ओरोस तालुका कुडाळ जिल्हा सिंधुदुर्ग ,
महाराष्ट्र ४१६८१२
ISO ९००१:२०१५

जा.क्र सिंजिप/साप्रवि/आस्था-१/1230 /२०२३ दिनांक :- २४/०८/२०२३ 25

**सरळसेवा भरती प्रक्रिया 2023**

**शुध्दीपत्रक - 2**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग अंतर्गत गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीचे शुध्दीपत्रक.**

---

जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या आस्थपनेवरील गट " क " संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात क्र.01/2023 दि.04/08/2023 अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरातीमध्ये खालील प्रमाणे अंशत: मजकूर समाविष्ठ करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पद | समाविष्ठ करण्यात आलेला बदल |
|---|---|---|
| 1 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाचा ऑनलाईन अर्ज करताना Have you passed recognized equivalant two Years Course in Construction Supervisor ? असा प्रश्न विचारणेत आला होता. परंतू सदरचा कोर्स हा एक वर्षाचा असल्यामुळे त्या पदासाठी उमदेवार अर्ज सादर करु शकत नव्हते.<br>तथापि त्यामध्ये सुधारणा करणेत आली असून आता Have you passed recognized equivalent Course in Construction Supervisor ? असा प्रश्न विचारणेत येत आहे. त्यामुळे सदर पदासाठी इच्छुक उमेदवार आपले अर्ज सादर करु शकतील. |
| 2 | विस्तार अधिकारी (कृषी) | विस्तार अधिकारी (कृषी) या संवर्गामध्ये ज्यांनी मान्यताप्राप्त विदयापीठाची कृषी विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केली असेल असे उमेदवार अर्ज करु शकतील असे जाहिरातीत नमुद केले आहे.<br>तथापि आता त्यामध्ये खालील पदवी धारण केलेले उमेदवार देखील अर्ज करु शकतील.<br>१) बी.एससी (ऑनर्स) उदयानविदया<br>२) बी.एससी (ऑनर्स) वनविद्या<br>३) बी.एससी (ऑनर्स) सामाजिक विज्ञान<br>४) बी.एफ.एससी (मत्स्य विज्ञान )<br>५) बी.टेक (कृषी अभियांत्रिकी)<br>६) बी.टेक (अन्न तंत्रज्ञान )<br>७) बी.टेक (जैव तंत्रज्ञान )<br>८) बी.एससी (एबीएम)/बी.बी.एम.(कृषी)/बी.बी.ए.(कृषि) / बी.एससी (ऑनर्स) कृषि व्यवसाय व्यवस्थापन |
| 3 | तारतंत्री | तारतंत्री या संवर्गामध्ये महाराष्ट्र शासनाच्या अनुज्ञापन मंडळाने दिलेले तारतंत्रीचे दुस-या वर्गाचे प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारण करणारे उमेदवार अर्ज करु शकतील असे जाहिरातीत नमूद केलेले आहे. परंतू ऑनलाईन अर्ज सादर करताना I.T.I. झालेल्या उमेदवारांना अर्ज सादर करण्यास अडचण निर्माण झालेली होती.<br>तथापि आता त्यामध्ये सुधारणा करणेत आलेली असून महाराष्ट्र शासनाच्या अनुज्ञापन मंडळाने दिलेले तारतंत्रीचे दुस-या वर्गाचे प्रमाणपत्र धारण केलेल्या उमेदवारांसोबत इतर अर्हता धारण करणा-या उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी Other असा पर्याय उपलब्ध करुन देणेत आलेला आहे. |

जाहिरातीतील उर्वरीत मजकूर कायम ठेवणेत येत आहे.

दिनांक - 24/08/2023

स्थळ - सिंधुदुर्गनगरी

प्रजित नायर (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

प्रत - जिल्हा परिषद सिंधुदुर्गसंकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.